खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. २५ वर्ष Year २०२५ दिनांक Date २८/०७/२०२५

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८ कलमे Sections ७

(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ........ तारीख पासून Date from २५/७/२५ वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to २८/०७/२५ वेळ Time ........

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date २५/०७/२०२५ वेळ Time १०:००

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ३२/२५ तारीख Date २८/०७/२०२५ वेळ Time २३:४५

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O. P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name लोअर परेल, रेल्वे स्टेशन, प्लॅटफार्म क्र. No. if any १ गल्ली Ward मुंबई रस्त्याचे नाव Name of road ........

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name आझाद खान (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name जमाल खान

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४८ वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9920602130

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation नोकरी

(g) धर्म Religion मुस्लिम जात Caste ........ जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address बि.नं. ९५ गल्ली/सर्व्हे नं. Ward फ्लॅट नं. ७०८, शुभम को.ऑप. हौ. सोसायटी, छत्रपति शिवाजी House Name No. Phone No. Pan No. Card No.

रस्त्याचे नाव Road राजे कॉम्प्लेक्स, लोकमान्य नगर समोर, जुना लिंक रोड, कांदिवली (प) मुं - ४०००६७ Nearest identifiable place Village Post P. St.

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

विनायक वसंत निकम, वय ५४ वर्षे, धंदा-नोकरी, पद-मुख्य नियंत्रण अधिकारी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा मुंबई प्रधान कार्यालय, रा.ठि. २०१, अंबर टॉवर, दुसरा मजला, सिताराम जाधव मार्ग, स्टेरस हॉटेलच्या बाजूला, लोअर परेल मुंबई ४०००१३

(G.C.P.) K 1043 (A) 1000-1-2025)

फिर्यादी श्री. आझाद जमाल खान वय ४७ वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा.ठी. बिं.नं.१ फ्लॅट नं.१०८, शुभम् को ऑप हौ. सोसायटी, छत्रपती शिवाजीराजे कॉम्प्लेक्स, एक नगर समोर, जुना लिंक रोड, कांदिवली (प) मुंबई-४०००६७ यांचा सविस्तर जबाब स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलिखीत केला असून सदरचा जबाब हिच गुन्हा प्रथम खबर म्हणून संबोधण्यात यावी.

समक्ष

आजाद खान

(sd/-)

मनोज सुतार
सहायक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

# जबाब

दि. २९/०७/२०२५

श्री. आजाद जमाल खान, वय- ४७ वर्षे धंदा - व्यवसाय, रा.ठी. रा.ठी. बिल्डींग नं १५, प्लॅट नं १०८, शुभम कौ.हौ.सोसा, छत्रपती शिवाजी राजे कॉम्पेक्स एकता नगर समोर, ओल्ड लिंग रोड, कांदीवली (पश्चिम), मुंबई ४०००६७, मोबाईल क्रमांक ९९२०६०२१३०, ९३२६११२१०७. आधारकार्ड क्र. - २६०२१४३६२१६५

----•----

मी, वरिलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझे कुंटुंबियांसह रहावयास आहे. माझे सोबत माझी पत्नी सौ. आयशा खान, वय ४० वर्षे, तीन मुली नामे १) इफ्फात, वय २१ वर्षे, २) अर्फा, वय १८ वर्षे, ३) आयत, वय ०८ वर्षे व मुलगा नामे अरजद, वय - १२ वर्षे असे राहावयास आहोत. मला पाच भाऊ १)रुमान, वय ३५ वर्षे २) मोहसीन, वय ३३ वर्षे ३) साहिद, वय ३० वर्षे ४) साजिद, वय २८ वर्षे ५) सारिक, वय २५ वर्षे असून दोन बहिणी नामे १)रुबिना, वय ४५ वर्षे २) सायमा, वय ३५ वर्षे आहेत. माझे तीन भाऊ १) रुमान २) मोहसीन ३) साहिद हे मुंबई मध्ये मी राहत असलेल्या परिसरास राहावयास आहेत. माझे दोन भाऊ १)साजिद २) सारिक हे उत्तर प्रदेश येथे राहते गावी जगनपूर, पोस्ट सोहावल, जिल्हा अयोध्या येथे राहावयास आहेत. ते अधूनमधून मुंबई येथे येत असतात. माझ्या दोन्ही बहिणींचे लग्न झाले असून त्यांचे सासरी असतात.

माझी पत्नी नामे आयशा खान हिचे नावावर न्यु परिवार बिल्डींग नं ०७, ऑफीस नं ०२, शुभम कौ.हौ. सोसा, छत्रपती शिवाजी राजे कॉम्पेक्स, एकता नगर समोर, ओल्ड लिंग रोड, कांदीवली (पश्चिम), मुंबई ४०००६७ येथे कर्मशिअल गाळा आहे. नमुद गाळा भाडे तत्वावर माझा भाऊ नामे साजिद जमाल खान यास अपना भारत गॅस एजन्सी चालविण्यासाठी दिलेला आहे. माझा भाऊ साजिद हा अधून मधून मुंबई मध्ये येत असतो. आमचा उत्तरप्रदेश येथे टाईल्स मार्बलचा व्यवसाय असल्याने तो सदर ठिकाणी व्यवसाय बघतो. साजिद याचे नावे अपना भारत गॅस एजन्सी आहे. त्याला नमुद एजन्सीवर देखरेख करणे शक्य नसल्याने त्याने गॅस एजन्सीमध्ये मला मॅनेजर म्हणून ठेवलेले आहे. नमुद गॅस एजन्सीचा संपुर्ण आर्थिक व्यवहार मी बघतो. तसेच माझे नातेवाईक मामा साजाब बसीर खान यांची कासार वडवली, घोडबंदर रोड, ठाणे येथे अ.के. भारत गॅस एजन्सी आहे. तेथील आर्थिक व्यवहार मी बघतो.

श्री. विनायक निकम, मुख्य निरीक्षण अधिकारी, शिधावाटप व नागरी पुरवठा विभाग, चर्चगेट, मुंबई यांनी दिनांक १९/१०/२०२४ रोजी कांदीवली च्या अपना भारत गॅस एजन्सीवर कारवाई केलेली आहे. त्यामुळे मी त्यांना ओळखतो. त्यामध्ये माझे आरोपी म्हणुन नाव आहे. दिनांक १९/१०/२०२४ रोजी विनायक निकम हे अपना भारत गॅस एजन्सीवर कारवाईकरीता आले असता, त्यांनी कारवाई न करण्यासाठी माझ्याकडे रूपये पंचवीस लाख लाचेची मागणी केली. मी लाचेची रक्कम देऊ न शकल्याने त्यांनी अपना गॅस एजन्सी वर कांदीवली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला. कारवाईच्यावेळी निकम यांनी मला ऑफीसला येवुन तेलंग साहेबांना भेट असे बोलले होते.

नागरी पुरवठा विभाग, ठाणे यांनी दिनांक २९/०८/२०२४ रोजी ठाणे येथील माझे नातेवाईक मामा नामे साजाब बसीर खान यांचे नावे असेलेल्या गॅस एजन्सीवर कारवाई केलेली आहे. त्यामध्ये आरोपी म्हणुन माझे देखील नाव आहे. नमुद दोन्ही केसेसच्या संदर्भात रेशनिंग व नागरी पुरवठा, मुख्यालय, चर्चगेट, मुंबई त्याचेकडुन नोटीस आल्यानंतर मी चर्चगेट येथील रेशनिंग व नागरी पुरवठा, मुख्यालय येथे सुनावणी कामी जात होतो. त्यावेळी विनायक निकम, मुख्य निरीक्षण अधिकारी हे मला सुनावणी कामी नमुद विभागाचे प्रमुख तेलंग साहेब याचे समोर हजर करीत होते.

समक्ष

विनायक निकम यांनी कांदीवली येथे केलेल्या कारवाईमध्ये कांदीवली पोलीस ठाणे येथे जप्त केलेल्या गाडया व सिलेंडर सोडवण्याकरीता पोलीस ठाणेस एन.ओ.सी. देणेकरीता माझ्याकडे जानेवारी, २०२५ मध्ये दहा लाख रूपये लाचेची मागणी केली. माझ्याकडे एवढी रक्कम नसल्याने मी त्यांना नकार दिला. त्यांनी तडजोड करून सात लाख रूपये लाचेची मागणी केली. मी इच्छा नसताना रक्कमेची जमवाजमव करून त्यांना दिनांक १७/०१/२०२५ रोजी दादर रेल्वेस्टेशन परिसरात लाचेची रक्कम दिली.

दि.१६/०७/२०२५ रोजी दुपारी ०४.१९ वा सुमारास माझे मोबाईल वर विनायक निकम, मुख्य निरीक्षण अधिकारी यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक ९८६७७९८१४२ यावरून कॉल केला व मला भेटण्यास बोलाविले. मी त्यांना दि.१७/०७/२०२५ रोजी त्यांचे केबीनमध्ये भेटण्यासाठी गेलो असता मी माझ्या फोनमधील रेकॉर्डीग चालु केली. आमचे दोघांमध्ये झालेले बोलणे हे माझे मोबाईल मध्ये रेकॉर्ड झाले आहे. विनायक निकम, मुख्य निरीक्षण अधिकारी यांनी यापुढे कांदीवली येथील अपना गॅस एजन्सीवर कारवाई न करण्याकरीता महिन्याला एक लाख पन्नास हजार रूपये व ठाणे येथील ओ.के. गॅस एजन्सीवर कारवाई न करण्याकरीता महिन्याला एक लाख रूपये असे एकुण दोन लाख पन्नास हजार रूपये दयावे लागतील असे सांगितले. मी त्यांना एवढी रक्कम देवु शकत नसल्याचे सांगितले. मी त्यांना कमी करा, मधला मार्ग काढा एवढी रक्कम नाही देवु शकत असे सांगितले. त्यांनी मला साहेबाशी बोलुन सांगतो असे सांगितले. त्यानंतर दि. १८/०७/२०२५ रोजी त्यांनी मला फोन करून साहेबांशी बोलणे झाले आहे, चर्चा करण्यासाठी या असे सांगितले. मला विनायक निकम, मुख्य निरीक्षण अधिकारी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी माझा मित्र नामे मुरारी अमरनाथ सिंग यांचे सोबत तक्रार देणेकामी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक २५/०७/२०२५ रोजी तक्रार अर्ज केला होता.

दिनांक २५/०७/२०२५ रोजी माझ्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता ला.प्र.वि. विभागाने स.पो.आ. सुतार व पो.नि. दिघे यांची नेमणूक केली होती. स.पो.आ. सुतार यांनी माझी तक्रार घेतल्यानंतर दोन शासकीय पंचांना पाचारण केले. मी ला.प्र.वि. विभागास केलेला तक्रार अर्ज दोन शासकीय पंचांना वाचण्यास दिला. दोन शासकीय पंचांना माझी व माझ्यासोबत असलेला माझा मित्र मुरारी याची ओळख करून दिली. मी दिलेल्या तक्रारीवर लोकसेवक यांनी लाचेची मागणी केली किंवा कसे? याबाबत पडताळणी करीता कारवाईमध्ये दोन शासकीय पंचांना पाचारण केले, असे सांगितले. त्यानंतर मला व दोन शासकीय पंचांना स.पो.आ. सुतार हे ला.प्र.वि. विभागाच्या रूम नं. १०२ मध्ये घेऊन गेले. तेथे गेल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयाची तांत्रिक विभागाचे पो.शि. मिंडे यांची ओळख करून दिली. स.पो.आ. सुतार यांच्या सूचनेनुसार पो.शि. मिंडे यांनी त्यांचे कार्यालयाचा डिजिटल व्हाईस रेकॉर्डर काढला. त्यामध्ये एस.डी. कार्ड टाकण्यात आले. स.पो.आ. सुतार यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती दिली. नमुद डिजिटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझे स.पो.आ. सुतार आणि दोन पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

त्यानंतर स.पो.आ. सुतार यांचे सूचनेनुसार मी लोकसेवक यांना माझे मोबाईलवरून फोन केला. परंतु त्यांनी फोन कट केला. पुन्हा फोन केला असता, लोकसेवक यांनी फोन उचलला. मी त्यांना भेटण्याबाबत विचारले असता, त्यांनी मला भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयात बोलावले. माझे लोकसेवक यांच्या सोबत झालेले संभाषण ला.प्र. वि. विभागाच्या डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

मी, दिनांक २५/०७/२०२५ रोजी दुपारी १५.३५ वाजता ला.प्र.वि. कार्यालयातून रवाना होऊन स.पो.आ. सुतार यांच्या सूचनेप्रमाणे पोलीस पथक, पंच, मुरारी यांचेसह पडताळणी कारवाईकरीता लोकसेवकाच्या कार्यालया जवळ उच्च न्यायालय, मुंबई यांचे पाठीमागील बाजुस सार्वजनिक रोडवर ओव्हल मैदानाशेजारी थांबलो. पंच क्र. १/मंदार पाटील हे माझ्यासोबत लोकसेवकाचे कार्यालयात येतील, असे सांगितले. स.पो.आ. सुतार यांनी मला व पंच

समक्ष

(मनोज सुतार)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

आजाद खान

(श्री. आजाद जमाल खान)

क्र. १ यांना पडताळणीकरीता जाताना घ्यावयाची काळजी याबाबत सूचना दिल्या. स.पो.आ. सुतार यांनी १६.०९ वाजता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पो.शि. मिंडे यांच्या मदतीने माझे शर्टचे आतमध्ये लावला. त्यानंतर मी व पंच क्र. १ लोकसेवकाच्या कार्यालयात चालत गेलो. कार्यालयात गेल्यानंतर लोकसेवक कार्यालयात हजर होते. त्यांनी मला व पंच क्र. १ यांना बराच वेळ बसून ठेवले. मी लोकसेवक यांच्याशी पैशांबाबत चर्चा केली. लोकसेवक यांनी कांदीवली येथील अपना गॅस एजन्सी वर कारवाई न करण्यासाठी दरमहा रूपये एक लाख पन्नास हजार व ठाणे येथील ओ.के. गॅस एजन्सीवर कारवाई न करण्यासाठी एक लाख रूपये असे एकूण दोन लाख पन्नास हजार रूपये मागितल्याचे मान्य केले. तडजोडीअंती लोकसेवक यांनी कांदीवली येथील अपना गॅस एजन्सी वर कारवाई न करण्यासाठी दरमहा रूपये एक लाख व ठाणे येथील ओ.के. गॅस एजन्सीवर कारवाई न करण्यासाठी पंचाहत्तर हजार रूपये असे एकूण दोन लाख पन्नास हजार रूपयेची लाचेची मागणी पंच क्र. १ यांचे समक्ष केली. लोकसेवक यांनी मला काही रक्कम गुडविल मध्ये सोमवार दिनांक २८/०७/२०२५ रोजी आणून देण्यास सांगितले. माझे व लोकसेवक यांच्यामध्ये झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले आहे. दिनांक २५/०७/२०२५ रोजी घडलेल्या सर्व घटना क्रमाचा ला.प्र.वि. विभागाने पंचनामा केलेला आहे.

दिनांक २८/०७/२०२५ रोजी मी व माझा मित्र मुरारी सकाळी ०९.३० वा. चे सुमारास ला.प्र.वि. कार्यालयात हजर झालो. स.पो.आ. सुतार यांनी मला व ०२ शासकीय पंचांना ला.प्र.वि. विभागाच्या रूम नं. १०२ मध्ये घेऊन गेले. तेथे गेल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयाचे तांत्रिक विभागाचे पो.शि. मिंडे हजर होते. स.पो.आ. सुतार यांच्या सूचनेनुसार पो.शि. मिंडे यांनी त्यांचे कार्यालयाचा डिजिटल व्हाईस रेकॉर्डर काढला. त्यामध्ये एस.डी. कार्ड टाकण्यात आले. स.पो.आ. सुतार यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती दिली. ला.प्र.वि. विभागाचे पो.ह. कावले यांची मला ओळख करून दिली. मी ५०० रूपये दराच्या १०० भारतीय चलनी नोटा एकूण ५०,०००/- रूपये सापळा कारवाईकरीता हजर केले. तसेच, खेळण्यातील रूपये एक लाख पंचवीस हजार हजर केले. मी हजर केलेले पन्नास हजार रूपये व खेळण्यातील एक लाख पंचवीस हजार रूपयांना पो.ह. कावले यांनी ॲन्थ्रासीन पावडर लावली. ॲन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. त्यानंतर स.पो.आ. सुतार यांच्या सूचनेनुसार पो.ह. कावले यांनी ॲन्थ्रासीन पावडर लावलेली एकूण रोख रक्कम एक लाख पंचाहत्तर हजार ही पिस्ता रंगाच्या कागदी पाकिटात टाकून माझे पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली.

मी, दिनांक २८/०७/२०२५ रोजी दुपारी १५.३० वाजता ला.प्र.वि. कार्यालयातून रवाना होऊन स.पो.आ. सुतार यांच्या सूचनेप्रमाणे पोलीस पथक, पंच, मुरारी यांचेसह पडताळणी कारवाईकरीता लोकसेवकाच्या कार्यालया जवळ उच्च न्यायालय, मुंबई यांचे पाठीमागील बाजुस सार्वजनिक रोडवर ओव्हल मैदानाशेजारी थांबलो. माझे लोकसेवक यांचेशी फोन वर बोलणे झाले असता लोकसेवक यांनी मला चर्चगेट रेल्वे स्टेशन येथे येण्यास सांगितले. स.पो.आ. सुतार यांनी पंच क्र. १/मंदार पाटील हे माझ्यासोबत लोकसेवक यांना भेटायला जातील, असे सांगितले. स.पो.आ. सुतार यांनी मला व पंच क्र. १ यांना सापळा कारवाईकरीता जाताना घ्यावयाची काळजी याबाबत सूचना दिल्या. स.पो.आ. सुतार यांनी लोकसेवक यांनी लाच स्विकारल्यानंतर मी माझा चष्मा काढून माझ्या शर्टच्या वरील खिशात ठेवावा, तो लाच स्विकारल्याचा इशारा असेल असे सांगितले. पोलीस पथक हे आजूबाजूला वेगवेगळे उभे राहून लोकसेवकास रंगेहाथ पकडण्याकरीता सापळा रचतील असे सांगितले. स.पो.आ. सुतार यांनी १९.३४ वाजता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पो.शि. मिंडे यांच्या मदतीने माझे शर्टचे आतमध्ये लावला. त्यानंतर मी व पंच क्र. १ लोकसेवकाने सांगितल्याप्रमाणे चर्चगेट रेल्वे स्टेशन येथे चालत गेलो. मी चर्चगेट रेल्वेस्टेशनला गेल्यानंतर लोकसेवक यांनी मला प्लॅटफॉर्म १ व २ च्या मध्ये भेटण्यास बोलाविले. लोकसेवक व माझी पंच क्र. १ यांचे समक्ष प्लॅटफॉर्म १ व २ च्या मध्ये भेट झाली. मी लोकसेवकासोबत चर्चा करत असताना माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशात असलेली लाचेची रक्कम देणेकरीता काढण्यास गेलो असता, लोकसेवक यांनी राहू दे, उद्या दे, असे सांगितले. म्हणून

समक्ष

(signature)

( मनोज सुतार )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

आझाद खान

(श्री. आझाद जमाल खान)

मी पोलीस पथकास कोणताही इशारा दिला नाही. लोकसेवक यास भेटून मी व पंच क्र. १ चर्चगेट स्टेशनच्या बाहेर आलो. दिनांक २८/०७/२०२५ रोजी घडलेल्या सर्व घटना क्रमाचा ला.प्र.वि. विभागाने पंचनामा केलेला आहे.

दिनांक २९/०७/२०२५ रोजी स.पो.आ. सुतार यांच्या सूचनेनुसार मी व माझा मित्र मुरारी सकाळी १०.०० वा. ला.प्र.वि. कार्यालयात हजर झालो. स.पो.आ. सुतार यांनी मला व ०२ शासकीय पंचांना ला.प्र.वि. विभागाच्या रुम नं. १०२ मध्ये घेऊन गेले. तेथे गेल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयाचे तांत्रिक विभागाचे पो.शि. मिंडे हजर होते. स.पो.आ. सुतार यांच्या सूचनेनुसार पो.शि. मिंडे यांनी त्यांचे कार्यालयाचा डिजिटल व्हाईस रेकॉर्डर काढला. त्यामध्ये एस.डी. कार्ड टाकण्यात आले. स.पो.आ. सुतार यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती दिली. ला.प्र.वि. विभागाचे पो.ह. कावले यांना बोलावून घेतले. मी दिनांक २८/०७/२०२५ रोजी ५०० रुपये दराच्या १०० भारतीय चलनी नोटा एकूण ५०,०००/- रुपये सापळा कारवाईकरीता हजर केलेल्या व खेळण्यातील रुपये एक लाख पंचवीस हजार हजर केलेल्या स.पो.आ. सुतार यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे पो.ह. कावले यांनी पुन्हा ॲन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर स.पो.आ. सुतार यांच्या सूचनेनुसार पो.ह. कावले यांनी ॲन्थ्रासीन पावडर लावलेली एकूण रोख रक्कम एक लाख पंचाहत्तर हजार ही पिस्ता रंगाच्या कागदी पाकिटात टाकून माझे पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली.

मी, दिनांक २९/०७/२०२५ रोजी दुपारी ११.३५ वाजता ला.प्र.वि. कार्यालयातून रवाना होऊन स.पो.आ. सुतार यांच्या सूचनेप्रमाणे पोलीस पथक, पंच, मुरारी यांचेसह पडताळणी कारवाईकरीता लोकसेवकाच्या कार्यालया जवळ उच्च न्यायालय, मुंबई यांचे पाठीमागील बाजुस सार्वजनिक रोडवर ओव्हल मैदानाशेजारी थांबलो. माझे लोकसेवक यांचेशी फोन वर बोलणे झाले असता लोकसेवक यांनी मला चर्चगेट रेल्वे स्टेशन येथून लोअर परेल रेल्वे स्टेशन येथे येण्यास सांगितले. स.पो.आ. सुतार यांनी पंच क्र. १/मंदार पाटील हे माझ्यासोबत जातील, असे सांगितले. स.पो.आ. सुतार व पो.नि. दिघे यांनी पंच, मला, पोलीस पथकास सापळा कारवाईच्या अनुषंगाने घ्यावयाच्या दक्षतेबाबत अवगत केले. माझ्या मागोमाग पोलीस पथक सापळा रचून थांबेल. लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर स.पो.आ. सुतार यांनी लोकसेवक यांनी लाच स्विकारल्यानंतर मी माझा चष्मा काढून माझ्या शर्टच्या वरील खिशात ठेवावा, तो लाच स्विकारल्याचा इशारा असेल असे सांगितले. स.पो.आ. सुतार यांनी १३.११ वाजता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पो.शि. मिंडे यांच्या मदतीने माझे शर्टचे आतमध्ये लावला. त्यानंतर पो.नि. दिघे यांनी मला व पंच क्र. १ यांना चर्चगेट रेल्वेस्टेशन येथे शासकीय वाहनाने सोडले. तेथून मी व पंच क्र. १ असे स्लो लोकलने लोअर परेल स्टेशन येथे उतरलो. लोकसेवकाने मला हॉटेल स्टेटस येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच क्र. १ स्टेटस हॉटेल, लोअर परेल, मुंबई या ठिकाणी पोहचलो. हॉटेलमध्ये गेल्यानंतर काही वेळाने लोकसेवक हॉटेलमध्ये आले व मला लोअर परेल रेल्वे स्टेशनच्या दिशेने घेऊन गेले. पोलीस पथक सापळा रचून आमच्या आजूबाजूला थांबले होते. मी, लोकसेवक व पंच लोअर परेल स्टेशन मधील प्लॅटफॉर्म क्र. १ च्या लगत असलेल्या मुख्य ब्रिजवर जाण्यासाठी असलेल्या एस्कलेटर च्या बाजूला बोलत होतो. त्याचदरम्यान मी माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवलेल्या एक लाख पंचाहत्तर हजार रुपयांच पाकिट उजव्या हाताने काढून लोकसेवकाच्या उजव्या हातात दिले. त्यानंतर लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर ठरल्याप्रमाणे मी माझ्या डोळयावरील चष्मा काढून माझ्या शर्टच्या वरील खिशात अडकवून पोलीस पथकास पूर्वनियोजित इशारा केला. त्याच वेळी लोअर परेल रेल्वे स्टेशनजवळ सापळा रचून उभे असलेले सापळा पथकाने लोकसेवक यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले. त्यानंतर पुढील कारवाईकरीता लाचलचूपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे घेऊन आले. दिनांक २९/०७/२०२५ रोजी घडलेल्या सर्व घटना क्रमाचा ला.प्र.वि. विभागाने पंचनामा केलेला आहे.

माझी श्री. विनायक निकम, मुख्य निरीक्षण अधिकारी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा कार्यालय, चर्चगेट, मुंबई यांच्या विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

समक्ष

( मनोज सुतार )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

आझाद खान

(श्री. आझाद जमाल खान)

माझे लोकसेवक श्री. विनायक निकम, मुख्य निरीक्षण अधिकारी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा कार्यालय, चर्चगेट, मुंबई यांचे बरोबर कोणतेही देवाण-घेवाण चे व्यवहार नाहीत किंवा कोणतेही पुर्ववैमनस्य नाही.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून, ती मला वाचून तसेच हिंदीतुन समजावून सांगितली असता, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

मनोज सुतार)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

आझाद खान

(श्री. आझाद जमाल खान)

समक्ष

आझाद खान

ाने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ................ तात्काळ ................
ns for delay in reporting by the complainant/informant

ोरील्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
ulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ................

Total Value of properties stolen / involved

) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

कस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ................
nnatural / Accidental Death Case No., if any.

ल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

irst Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

तील नमुद 'फि' हे कांदिवली येथील गॅस एजन्सीमध्ये मॅनेजर म्हणून काम पाहतात. तसेच त्यांचे नातेवाईक यांची
येथे गॅस एजन्सीज आहेत. यातील आलोसे विनायक वसंत निकम मुख्य निरीक्षण अधिकारी, नियंत्रक शिधावाटप
संचालक नागरी पुरवठा मुंबई यांनी 'फि' यांचे नातेवाईकांच्या मगे येथील एजन्सीवर ऑगस्ट २०२४ व 'फि' यांचे
त एजन्सीवर ऑक्टो-२०२४ मध्ये कारवाई केली होती. त्यानुसार दि. १७/०७/२०२५ रोजी आलोसे यांनी 'फि' यांचे गॅस
न्सी वर कारवाई न करण्याकरीता मासिक १,५०,०००/- व नातेवाईकांच्या गॅस एजन्सीवर कारवाई न करण्याकरीता १,००,०००/-
से एकूण २,५०,०००/- रु. लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती १,७५,०००/- रु. देण्याचे ठरले वरील ता. वे. व ठिकाणी आलोसे यांना
र्ची, रक्कम १,७५,०००/- रु. स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून त्यांचे विरुद्ध भ्र.प्र.अधि. १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद

केलेली **कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या ................

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : सपोआ - मनोज सुतार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ................

................ जिल्हा ................ राज्य ................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 (Name of I.O) .............. Rank .............. No. ............

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ................

(3) Transferred to P. S. ................
District ................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

आज्ञाद २०१७

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. (signature)

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...मनोज सुतार...

पदनाम Rank ...सहायक पोलीस आयुक्त...

तपासिक अ. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

Posting

Code No. of I. O. ................

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ................

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report